ॲड श्री. धनंजय माने, विशेष सरकारी अभियोक्ता यांना व्यावसायिक फी मंजूर करण्याबाबत.
मंगळवेढा पो.स्टे., जि. सोलापूर येथील गु.र.क्र.४३०/२०१८ येथे दाखल गुन्ह्यात उद्भवणाऱ्या मा. विशेष सत्र न्यायालय, पंढरपूर, जि. सोलापूर या प्रकरणात न्यायालयीन कामकाजासाठी.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्रमांक :- एसपीपी-०११९/प्र.क्र.५६/पोल-१०,
दुसरा मजला, मंत्रालय, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा मार्ग, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- १६ जुलै, २०१९

संदर्भ :- शासन अधिसूचना, विधि व न्याय विभाग, क्रमांक एसपीपी-३७१९/यु.ओ.आर.१५/ डी-१४, दिनांक १६.०५.२०१९.

शासन निर्णय :-

मंगळवेढा पो.स्टे., जि. सोलापूर येथील गु.र.क्र.४३०/२०१८ येथे दाखल गुन्ह्यात उद्भवलेल्या मा. विशेष सत्र न्यायालय, जि. सोलापूर येथील सेशन केस क्रमांक २०/२०१९ या प्रकरणात न्यायालयीन कामकाज पाहण्याकरीता ॲड श्री. धनंजय माने यांची विधि व न्याय विभागाने वरील संदर्भाधीन दिनांक १६.०५.२०१९ च्या अधिसूचनेन्वये विशेष सरकारी अभियोक्ता म्हणून नियुक्ती केली आहे. तसेच, ॲड श्री. धनंजय माने, विशेष सरकारी अभियोक्ता यांना शासकीय दराने फी अदा करण्यास मान्यता दिलेली आहे. सबब, प्रस्तुत प्रकरणी ॲड श्री. धनंजय माने, विशेष सरकारी अभियोक्ता यांना शासन निर्णय, विधि व न्याय विभाग, क्रमांक मिटींग-२०११/(२४९)/डी-१४, दिनांक १५.०२.२०१४ मधील Statement "E" मध्ये नमूद केलेल्या शासकीय दराने फी अदा करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. परिणामकारक सुनावणीचे दिवस संबंधीत प्रकरणाच्या पर्यवेक्षीय पोलीस उपायुक्त दर्जाहून कमी नाही, अशा अधिकाऱ्याकडून प्रमाणित करुन घेण्यात यावेत व कोणत्याही प्रकारचे अतिरिक्त प्रदान होणार नाही, याची दक्षता घ्यावी. तसेच, प्रस्तुत प्रकरणी ॲड श्री. धनंजय माने, विशेष सरकारी अभियोक्ता यांना शासकीय फी व इतर अनुज्ञेय भत्ते याव्यतिरिक्त अन्य कोणतीही फी वा भत्ते अनुज्ञेय असणार नाहीत.

३. यासाठी येणारा खर्च विभागाच्या मागणी क्र. बी-१, २०५५ पोलीस - (००) १०९, जिल्हा पोलीस (००)(०१) जिल्हा पोलीस दल - (२०५५ ०१६८) - २८ व्यावसायिक सेवा या लेखाशिर्षाखालील त्या त्या आर्थिक वर्षाच्या मंजूर अनुदानातून व मासिक निधी विवरणपत्रानुसार भागविण्यात येईल.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१९०७१७१५०५२६८६२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Kishor Shyamrao Bhalerao

Digitally signed by Kishor Shyamrao Bhalerao
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ce6f6edd7e1dfc6b4d6b65b7d93aa1a1dbcf0ec79c7c2143850ff6e8fdcb4c0d, serialNumber=94524ab889e2fa9e6bfe5e1e58426881bc36b968ffd0f45ce2d4bd3ff527ded2, cn=Kishor Shyamrao Bhalerao
Date: 2019.07.17 15:13:39 +05'30'

(किशोर भालेराव)
उप सचिव (विधि), गृह विभाग, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. विशेष पोलीस महानिरीक्षक, कोल्हापूर परिक्षेत्र, कोल्हापूर.
३. पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण, जि. सोलापूर.
४. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा)- १/२ महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर
५. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
६. जिल्हा कोषागार अधिकारी, जि. सोलापूर.
७. विधि व न्याय विभाग, (का-१४), मंत्रालय, मुंबई.
८. वित्त विभाग, (व्यय-७), मंत्रालय, मुंबई.
९. ॲड श्री. धनंजय माने, घर क्रमांक २११, सोलापूर शहर, नवी पेठ, डी.सी.सी. बँकेजवळ, सोलापूर ४१३ ००७.
१०. निवडनस्ती/पोल-१०.